# ‘एम. बी. ए. सामाईक परीक्षा मार्गदर्शन व कृषी उद्योजकता’ या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा

क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालय कुंडल मधील वाणिज्य विभागाच्या वतीने बुधवार दि. २२ जानेवारी २०२५ रोजी ‘एम. बी. ए. सामाईक परीक्षा मार्गदर्शन व कृषी उद्योजकता’ या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या साठी व्यंकटेश्वरा इन्स्टीटयूट ऑफ मॅनेजमेंट, पेठ येथील सहा. प्राध्यापक डॉ. ए. एम. खरात आणि श्री. अमित पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सदर कार्यशाळा ही दोन्ही महाविद्यालयामध्ये असणाऱ्या सामंज्यस्य करारांतर्गत आयोजित करण्यात आली.

सर्वप्रथम वाणिज्य विभागप्रमुख डॉ. पी. बी. लुपणे यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले आणि परिचय करून दिला. तसेच माविद्यालायातील वाणिज्य विभागाची माहिती प्रमुख पाहुण्यांना करून दिली.

यानंतर पहिल्या सत्रामध्ये श्री. अमित पाटील यांनी कृषी उद्योजकता या विषयावर आपले विचार व्यक्त केले. यामध्ये शेतीचे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये असलेले योगदान त्याचप्रमाणे शेती आणि शेती पूरक व्यवसायामध्ये असणाऱ्या विविध रोजगार संधी याचे मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी नोकरीच्या मग न लागता आधुनिक पद्धतीने आणि अद्ययावत तंत्रज्ञानाने शेती करावी आणि शेतीकडे व्यावसायिक दृष्टीने पाहावे, असे मत व्यक्त केले.

दुसऱ्या सत्रामध्ये डॉ. ए. एम. खरात यांनी एम. बी. ए. सामाईक परीक्षेबद्दलची माहिती विद्यार्थ्यांना दिली. त्यामध्ये या परीक्षेचे स्वरूप, त्याची पात्रता, परीक्षा फी व परीक्षा केंद्र  यांचा समावेश होता. त्याचप्रमाणे एम. बी. ए. नंतर असणाऱ्या रोजगार संधी याचे देखील विवेचन केले. शेवटी एम. बी. ए. सामाईक परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी कोणत्या प्रकारे तयारी करावयाची याचे देखील मार्गदर्शन केले.

शेवटी या कार्यशाळेचे आभार वाणिज्य विभागातील अर्थशास्त्र विषयाच्या प्राध्यापिका कु. ए. बी. जाधव यांनी पाहुण्यांचे व विद्यार्थ्यांचे आभार मानले. या कार्यशाळेसाठी वाणिज्य विषयाच्या प्राध्यापिका कु. प्रतिभा सावत तसेच वाणिज्य विभागातील १८ विद्यार्थिनी व ०३ विद्यार्थी उपस्थित होते.

- प्रमुख पाहुण्यांचे स्वागत आणि परिचय करून देताना वाणिज्य विभागप्रमुख डॉ. पी. बी. लुपणे...




- पहिल्या सत्रामध्ये श्री कृषी उद्योजकता या विषयावर आपले विचार व्यक्त करताना श्री. अमित पाटील...






- दुसऱ्या सत्रामध्ये एम. बी. ए. सामाईक परीक्षेबद्दलची माहिती विद्यार्थ्यांना देताना डॉ. ए. एम. खरात...







- का

र्यशाळेचे आभार मानताना वाणिज्य विभागातील अर्थशास्त्र विषयाच्या प्राध्यापिका कु. ए. बी. जाधव ...




- कार्यशाळेसाठी उपस्थित वाणिज्य विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनी ...




GPS Map Camera
Kundal, Maharashtra, India
4c74+98f, Kundal, Maharashtra 416309, India
Lat 17.113551° Long 74.405836°
22/01/25 10:43 AM GMT +05:30
Google